# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६**

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ११

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडडी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०५, कला व संस्कृती**<br>**रूपये:- १३,९०,८७,१९,०००/-**<br>**श्री. भास्कर जाधव** |
| (१) | १३५० | १०० | ६४ व्या राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत चंद्रपूर केंद्रावर अनेक नियमबाह्य कृती घडणे, चंद्रपूर केंद्रावर नियुक्त झालेल्या महिला परीक्षक नागपूर केंद्रावर विजेत्या ठरलेल्या एका नाटकाच्या निर्मात्या असणे, एका केंद्रावर स्पर्धक आणि दुसऱ्या केंद्रावर परीक्षक अशा पद्धतीने नियमबाह्य नियुक्ती सांस्कृतिक कार्य संचालनालयाने करणे,त्याचप्रमाणे चिंचवड केंद्रावर नेपथ्याचे तृतीय पारितोषिक विजेत्या स्पर्धकाला रत्नागिरी केंद्रावर परीक्षक म्हणून नियुक्ती देण्यात येणे, चंद्रपूर केंद्रावरील नागपूरच्या परीक्षकाने स्पर्धा मुख्यालयी न राहता दररोज नागपूरला येजा करणे, चंद्रपूर केंद्रावर समन्वयका व्यतिरिक्त अन्य सहा स्पर्धा बाह्य व्यक्तीचा हस्तक्षेप असणे, एका केंद्रावर स्पर्धक व दुसऱ्या केंद्रावर तीच व्यक्ती परीक्षक अशा पद्धतीने परीक्षकांच्या नियुक्ती करण्यात आल्यामुळे स्पर्धक नाट्य संघांमध्ये निर्माण झालेले अशा असंतोषाचे वातावरण,नाट्यरंग चंद्रपूर या संस्थेने संचालक सांस्कृतिक कार्य यांना तीन महिन्यांपूर्वी पत्र पाठवून काही गोष्टींच्या अनुषंगाने उत्तर मागितले असताना देखील त्या संस्थेला उत्तर न मिळणे, या मुळे अनेक वाद निर्माण होणे, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (२) | १४२१ | १०० | राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धक संस्थांच्या विविध मागण्यासाठी हौशी प्रायोगिक कलावंत संघ या मान्यता प्राप्त संघटनेने संचालक सांस्कृतिक कार्य यांच्याशी सातत्याने पत्रव्यवहार करणे, अनेक केंद्रावर बाहेरच्या संघांनी येऊन सादरीकरण करून स्थानिक कलावतांचा हक्क डावलला जाणे, परीक्षक नियुक्ती प्रक्रिया सदोष असणे, या स्पर्धेच्या एकूणच प्रक्रियेतले दोष दूर करुन स्पर्धेचा नवा फॉर्मेट तयार करण्याच्या दृष्टीने हौशी प्रायोगिक कलावंत संघ या संघटनेने संचालक सांस्कृतिक कार्य यांना लेखी निवेदनाद्वारे सूचित करणे, महाराष्ट्र राज्य शासनाच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | स्पर्धेत गोवा व मध्यप्रदेश या राज्यातील संघ सहभागी होण्याची पूर्वा पार चालत आलेली परंपरा बंद करण्याची तसेच स्पर्धेच्या नियमावलीत आमूलाग्र बदल करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होणारे दुर्लक्ष, परिणामी रंगकर्मी मध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: झेडडी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४५२, पर्यटन**<br>**रूपये:- २१,६१,९२,००,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (३) | १४४४ | १० | श्रीरामपूर तालुक्यातील महानुभाव पंथाचे व शीख संप्रदायाचे तीर्थक्षेत्र डोमेग्राम, त्याचप्रमाणे तिळापुर मेळ येथील संगमेश्वर देवस्थान, दायमाबाद येथील पुरातत्वीय उत्खनन स्थळ अशा पर्यटन व तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (४) | १४१३ | १० | सांगोला तालुक्यातील कोळा हे गाव ऐतिहासिक व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अस्थिकलश अत्यंत आदरपूर्वक जतन करून ठेवण्यात आलेला असून हे ठिकाण आंबेडकरी अनुयायी व समाजासाठी प्रेरणास्थान मानले जाते. भारताच्या संविधानाचे शिल्पकार असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समता, शिक्षण आणि मानवाधिकारांसाठी मोठे कार्य केले असून त्यांचे विचार आजही लाखो लोकांना प्रेरणा देतात. कोळा येथे बाबासाहेबांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेण्यासाठी तसेच त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी अनेक अनुयायी व नागरिक भेट देत असतात. परंतु या ठिकाणी भाविक व नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा अपुऱ्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना बाबासाहेबांचे विचार व कार्य यांचा अभ्यास करता यावा यासाठी येथे सुरू असलेली अभ्यासिका सध्या अपुरी पडत आहे. त्यामुळे या ठिकाणी सुसज्ज अभ्यासिका, वाचनालय, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशासाठी योग्य स्मारक, मंदिर उभारणे आणि परिसराचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. या ठिकाणाचा विकास केल्यास विद्यार्थ्यांना बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा मिळेल तसेच सामाजिक व शैक्षणिक चळवळीला चालना मिळेल. म्हणून सांगोला तालुक्यातील कोळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिकलश स्थळाचा पर्यटन व प्रेरणास्थळ म्हणून विकास करण्यासाठी राज्य शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५) | १४१८ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील कोळा येथे असलेले हेमाडपंथी महादेव मंदिर हे अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक महत्त्व असलेले मंदिर आहे. या मंदिराची रचना हेमाडपंथी स्थापत्यशैलीतील असून ते या परिसरातील एक महत्त्वाचे धार्मिक व सांस्कृतिक श्रद्धास्थान मानले जाते. दरवर्षी महाशिवरात्रीच्या निमित्ताने येथे मोठा उत्सव भरत असून सांगोला तालुक्यासह सोलापूर जिल्हा व इतर भागांतून हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. मात्र या ठिकाणी भाविकांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा जसे की रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, विश्रांती व्यवस्था, परिसर सुशोभीकरण इत्यादी सुविधांचा अभाव दिसून येतो. या ऐतिहासिक मंदिराचे धार्मिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्व लक्षात घेता या ठिकाणाचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करून मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील तसेच या परिसराच्या पर्यटन विकासालाही चालना मिळेल. म्हणून सांगोला तालुक्यातील कोळा येथील हेमाडपंथी महादेव मंदिरासाठी तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करून त्यास शासनाने मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (६) | १४२६ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील बुद्धेहाळ तलाव हा परिसरातील महत्त्वाचा जलस्रोत असून या तलावाला नैसर्गिक व पर्यटनदृष्ट्या मोठे महत्त्व आहे. तलाव परिसर विस्तीर्ण व निसर्गरम्य असल्यामुळे येथे पर्यटन विकासाची मोठी क्षमता आहे. मात्र सध्या या तलाव परिसरात आवश्यक पायाभूत सुविधा व सुशोभीकरणाचा अभाव असल्यामुळे या ठिकाणाचा पर्यटनाच्या दृष्टीने अपेक्षित विकास झालेला दिसून येत नाही. जर या तलावाचे नियोजनबद्ध सुशोभीकरण करण्यात आले तर सांगोला तालुक्यासह परिसरातील नागरिकांसाठी हे एक आकर्षक पर्यटनस्थळ ठरू शकते. तलाव परिसरात सुशोभीकरण, पायवाटा, बाग-बगीचे, बसण्याची व्यवस्था, प्रकाशयोजना तसेच नौकाविहार (बोटिंग) सुविधा उपलब्ध करून दिल्यास येथे पर्यटनाला मोठी चालना मिळेल. यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही फायदा होईल. म्हणून सांगोला तालुक्यातील बुद्धेहाळ तलावाचे सुशोभीकरण करून येथे नौकाविहाराची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पर्यटन स्थळ म्हणून या ठिकाणाचा विकास करण्याबाबत राज्य शासनाने आवश्यक कार्यवाही करून विकास आराखडा मंजूर करावा व त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (७) | १३२४ | १० | भंडारा जिल्हयात साकोली, तालुक्यातील नागझिरा राष्ट्रीय अभयारण्याकडे विदेशी पर्यटक इतर पर्यटक हे लाखोंच्या संख्येने येत असुन साकोली ते नागझिरा कडे जाणारा रस्ता हे अत्यंत खराब असुन रस्ता ब-यांच ठिकाणी दबलेला व उखडलेला |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आहे, तसेच नागझिरा अभयारण्याकडे मुलभूत सुविधांचा अभाव असणे, तसेच भंडारा जिल्हयातील मौजा चारभट्टी येथील हनुमान मंदिर, मौजा उत्तरवाहिनी (मांडळ) येथील देवस्थान, मौजा दिघोरी मोठी येथील हनुमान मंदिर देवस्थान ता.लाखांदूर मौजा सुकळ महालगांव, मौजा कुभंली येथील दुर्गाबाई डोह, मौजा उकारा येथील शिवमंदिर, मौजा सेंदुरवाफा येथील गजानन बाबा मंदिर, मौजा शिवनीबांध येथील जलाशय , मौजा सावरबंद येथील मोतीराम बाबा आश्रम, मौजा गिरोला येथील देवस्थान तालुका साकोली, मौजा किटाळी येथील बालाजी किल्ला, मौजा भुगाव पंढरपूर येथील देवस्थान ता. लाखनी जि.भंडारा येथे मुलभूत सुविधा व निधीच्या अभाव असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (८) | १४२७ | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील श्री क्षेत्र तारकेश्वर हे ‘क’ वर्ग पर्यटन स्थळ म्हणून घोषित असून येथे दरवर्षी लाखो भाविक व पर्यटक भेट देत असतात. सदर पर्यटन स्थळ येरवडा येथील डोंगरमाथ्यावर असून शहराच्या उत्तर–पूर्व भागात स्थित आहे. परिसर दाट लोकवस्तीचा असून पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षणीय आहे. मात्र या ठिकाणी पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा व विकासकामांचा अभाव आहे. त्यामुळे रस्ता, पायवाट, स्वच्छतागृह, प्रकाश व्यवस्था तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून पर्यटन स्थळाचा नियोजनबद्ध विकास करणे आवश्यक आहे. याबाबत आवश्यक निधी उपलब्ध करून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | १४३० | १० | लोहगाव हे जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचे आजोळ असून ऐतिहासिक व धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण आहे. सदर परिसर ‘क’ वर्ग पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित असून येथे मोठ्या संख्येने भाविक व पर्यटक भेट देत असतात. लोहगाव लगत असलेल्या हरणतळे परिसरात तुकाराम महाराजांचे स्मारक उभारून हे ठिकाण पर्यटन स्थळ म्हणून विकसित करणे आवश्यक आहे. या ठिकाणी पर्यटकांसाठी पायवाट/ट्रॅक विकसित करणे, स्वच्छतागृहाची उभारणी करणे तसेच मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे या ऐतिहासिक स्थळाचा विकास होऊन पर्यटकांना आवश्यक सुविधा उपलब्ध होतील. याबाबत आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (१०) | १४१५ | १० | जि. गडचिरोली मध्ये कोराची तालुक्यात टिपागड हे निर्सगरम्य व जंगल परिसर असून हे पर्यटकांना आर्कषित करणारे आहे. येथे पर्यटक येत असतात. त्यामुळे येथील पर्यटकांना सोई-सुविधा उपलब्ध करण्याकरिता व पर्यटकांना पर्यटनासाठी येण्याकरिता अधिक सुलभ होण्याकरिता व स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करुन देण्याकरिता वन पर्यटन ईको-टुरिझम प्रकल्प सुरु करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (११) | १३०१ | १० | मुंबईतील एरंगळ मालाड (प.) येथे पर्यटनदृष्टया विकास करण्याचा शासनाने दानापानी बीच सुरु केलेले काम, येथील पर्यटन विकास महामंडळाच्या ३४ एकर जागेवर घातलेले तारेचे कुंपण, तसेच या जागेवर टेन्ट सिटी विकसीत करण्यासाठी हाती घेतलेला प्रकल्प, परंतु त्यास होत असलेला विलंब, त्यामुळे व्यक्त होणारा रोष लक्षात घेता शासनाने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १२ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई